POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०० ● मुंबई, मंगळवार, ०२ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

## तुकाराम मुंढेंचा धडाका! स्प्रे मारुन पिकवले जाणारे 11 लाखांचे आंबे जप्त

## ठाण्यात एफडीएची धडक कारवाई, 37 जणांना अटक, 31 दुकानांना टाळे

**नागरिकांना आवाहन**

भेसळयुक्त किंवा प्रतिबंधित अन्नपदार्थांची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तातडीने तक्रार करावी, असे आवाहन एफडीएने केले आहे. तक्रारींसाठी १८००२२२३६५ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रशासनाची ही मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्याचाच भाग म्हणून ठाणे जिल्ह्यात ३० आणि ३१ मे रोजी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोठी मोहीम राबवत नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटसह विविध भागांत धाडी टाकल्या. या कारवाईत कृत्रिम पद्धतीने पिकवण्यात आलेल्या आंब्यांचा मोठा साठा जप्त करण्यात आला.



एफडीएच्या तपासात काही व्यापारी आंबे पिकवण्यासाठी नियमबाह्य पद्धतीने इथिलिनसदृश स्प्रेचा थेट वापर करत असल्याचे उघड झाले. याप्रकरणी तीन मोठ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. तब्बल ३,४५३ किलो आंबे जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत ११ लाख १२ हजार ८५० रुपये आहे. जप्त केलेल्या आंब्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

**नियमांचे उल्लंघन उघड**

एफएसएसएआयच्या नियमांनुसार फळांवर थेट इथिलिन स्प्रे मारण्यास बंदी आहे. फळे पिकवण्यासाठी इथिलिन गॅस चेंबरचा वापर करणे बंधनकारक आहे. मात्र तपासणीत अनेक व्यापारी नियमांचे उल्लंघन करताना आढळले. दिलासादायक बाब म्हणजे कॅल्शियम कार्बाइड या घातक रसायनाचा वापर कुठेही आढळून आला नाही.

**गुटखा-पानमसाल्यावरही कारवाई**

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त २९ ते ३१ मेदरम्यान गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूविरोधातही विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत ३६ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. ४ लाख ७४ हजार ४०७ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला.

या प्रकरणात विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले असून आतापर्यंत ३७ जणांना अटक झाली आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणारी ३१ आस्थापने सील करण्यात आली आहेत.

## जून महिन्यात मान्सूनचं टेन्शन वाढलं 29 जिल्ह्यांवर मोठं संकट



■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यात मान्सूनपूर्व पावसाची सक्रियता वाढताना दिसत आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत काही दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस थैमान घालणार आहे. राज्यातील 23 जिल्ह्यांना हवामान विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. 6 जिल्ह्यांना धोक्याचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. तसेच उष्णतेची तीव्रता कायम राहणार असून जाणून घ्या एकूण हवामान विभागाचा अंदाज.

**कोकण :** कोकण विभागातील पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. किनारपट्टी भागात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**उत्तर महाराष्ट्र :** उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि नंदूरबार या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी केला. धुळे आणि नाशिक या दोन जिल्ह्यांना उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी केला.

**पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे आणि सातारा या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला. या भागांत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वातावरणात बदल होण्याची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगलवी आणि सोलापूर या जिल्ह्यांत कोणताही अलर्ट जारी केला नाही.

**मराठवाडा :** मराठवाडा विभागातील बीड, हिंगोली, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी केला. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट वर्तवण्यात आला.

**विदर्भ :** विदर्भ अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला. तसेच भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली.



## नालासोपाऱ्यात पूर रोखण्यासाठी 400 कोटींचा धारण तलाव प्रकल्प

■वसई । प्रतिनिधी,

दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पुरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी वसई-विरार महापालिकेने नालासोपारा येथे धारण तलाव उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी आता तब्बल 400 कोटी रुपयांचा नवा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. वसई-विरार परिसरात गेल्या काही वर्षांपासून मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचण्याच्या आणि पुरस्थिती निर्माण होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. नागरिकांना याचा मोठा फटका बसत असून वाहतूक तसेच दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी वसई-विरार महापालिकेकडून नालासोपारा येथे धारण तलाव (होल्डिंग पाँड्स) उभारण्याची योजना आखण्यात आली आहे.

पुरस्थितीचा अभ्यास करण्यासाठी महापालिकेकडून राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधनसंस्था (निरी) आणि भरतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) यांच्या तज्ञ समित्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या समित्यांनी शहरातील पाणी साठवण्यासाठी धारण तलाव उभारण्याची शिफारस केली होती. त्या अनुषंगाने नालासोपारा पश्चिमेतील नीळेमोरे परिसरात सुमारे 19 हजार 860.64 चौरस मीटर क्षेत्रात धारण तलाव उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मात्र गेल्या दोन ते तीन वर्षांपासून या प्रकल्पासाठी प्रस्ताव तयार होत असले तरी त्याला अपेक्षित गती मिळाली नाही. त्यामुळे प्रकल्प रखडल्याचे चित्र होते. आता या रखडलेल्या प्रकल्पाला चालना देण्यासाठी महापालिकेकडून नव्याने 400 कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी अर्बन चॅलेंज फंड आणि आपत्ती व्यवस्थापन विभागातून निधी मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी यांनी दिली. पालिकेच्या या निर्णयामुळे भविष्यात पुरस्थितीवर नियंत्रण मिळवण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये 24 तासांसाठी एमआयडीसीचा पाणी पुरवठा बंद

■भाईंदर। प्रतिनिधी,

यावर्षी अलानिनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे समुद्र प्रवाह सक्रिय झाले असून, पावसाळा लांबण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी काळात शहरात पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून मिरा-भाईंदर महापालिकेने पाणी कपातीचा निर्णय घेतला आहे. जलसंपदा विभागासोबत झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, एमआयडीसीकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा गुरुवार, ४ जून रोजी दुपारी १२ वाजेपासून ते शुक्रवार, ५ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत शहराचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) बारवी आणि जांभूळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातून मिरा-भाईंदर शहराला होणारा पाणी पुरवठा या २४ तासांच्या कालावधीत पूर्णपणे बंद राहणार आहे. तर दिलासादायक बाब म्हणजे स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा या काळात सुरळीत सुरू राहणार आहे. एमआयडीसीचा पुरवठा बंद राहणार असल्याने, गुरुवारी आणि शुक्रवारी पाणी पुरवठा पूर्ववत होईपर्यंत संपूर्ण शहरात अत्यंत कमी दाबाने आणि उशिराने पाणी पुरवठा होणार आहे. आगामी संभाव्य पाणी टंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, पाणी वाया घालवू नये आणि महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन मिरा-भाईंदर महापालिका पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाकडून करण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवडच्या दुर्घटनेनंतर वसई-विरार पोलीस सतर्क! जंगलातील बेकायदेशीर हातभट्ट्या केल्या उद्ध्वस्त

■वसई । प्रतिनिधी,

पुणे येथील पिंपरी चिंचवड व हडपसर येथे विषारी दारूच्या सेवनामुळे अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालयाने धडक कारवाया सुरू केल्या आहेत. विरार गुन्हे शाखा कक्ष ३ व पेल्हार गुन्हेप्रकटीकरण शाखेच्या पथकाने दुर्गम जंगलांमध्ये सुरू असलेल्या दोन वेगवेगळ्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर छापे टाकून पोलिसांनी एकूण १ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला आहे.

या प्रकरणी दोन महिलांवर दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.पहिली कारवाई ही २९ मे २०२६ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत वसई फाट्याजवळील रिचर्ड कंम्पाऊन्ड, मनिचा पाडालगतच्या जंगलात कारवाई करण्यात आली. सहाय्यक फौजदार शिवाजी पाटील यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे, जंगलातील एका तात्पुरत्या शेडमध्ये चालर्णाया हातभट्टीवर छापा टाकण्यात आला.तेथून पोलिसांनी १ लाख ७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. येथीलही साधनसामग्री वाहून नेणे अशक्य असल्याने ती जागेवरच नष्ट करण्यात आली.

तर दुसरी कारवाई ही ३० मे २०२६ रोजी विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग सुरू असताना, पोलीस हवालदार सुनिल पाटील यांना बरफपाडा येथील जंगलात छुप्या पद्धतीने गावठी दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांना याबाबत माहिती दिल्यानंतर, वरिष्ठांच्या सूचनेनुसार पोलीस पथकाने जंगलात छापा टाकला. या कारवाईत ६२ हजार ५० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. जंगलातील दुर्गम रस्ता आणि वाहतुकीची अडचण लक्षात घेता, तपासणी पुरते दारूचे नमुने काढून उर्वरित दारू, रसायन (वॉश), अल्युमिनियमच्या टाक्या आणि प्लास्टिक ड्रम पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



## मराठी माणसाला घर नाकारले, मंत्री सरनाईकांनी झापले

■भाईंदर। प्रतिनिधी,





मिरा-भाईंदर महापालिका मुख्यालयासमोर व्यवसाय करणार्या शिंदे आडनावाच्या मराठी कुटुंबाला स्थानिकांनी घर देण्यास नकार दिल्याची बाब समोर आली आहे. या संदर्भात महिलेने केलेल्या आरोपांनंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनीही संबंधित महिलेच्या समर्थनार्थ भूमिका घेतली आहे.याप्रकरणी सरनाईक यांनी शिंदे कुटुंबियांची भेट घेतली आणि मराठी माणसाला घर नाकारणार्या घर मालकांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, संबंधित घरमालकाला तात्काळ घटनास्थळी बोलावून घेत मंत्री सरनाईक यांनी अत्यंत कठोर शब्दांत त्यांची कानउघडणी केली आणि त्याला कायदेशीर परिणामांची जाणीव करून दिली.

भाईंदर पश्चिम येथील मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्यालयासमोर उभारण्यात आलेल्या नव्या इमारतीमध्ये रेणुका शिंदे या महिला आपल्या कुटुंबीयांसोबत चहाचा व्यवसाय करतात. अवघ्या महिनाभरापूर्वीच हा व्यवसाय सुरू केल्यामुळे महिला, त्यांचे पती आणि लहान बाळ हे सध्या दुकानामध्येच राहत आहेत. मात्र, जागेची अडचण भासू लागल्याने त्यांनी परिसरात भाड्याने घर घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी स्थानिक दलालांशी संपर्क साधून घर शोधण्यास सुरुवात केली होती. दरम्यान, जवळच असलेले एक घर त्यांना पसंत पडले. मात्र, त्या इमारतीतील सोसायटी पदाधिकार्यांनी मराठी असल्यामुळे घर देण्यास नकार दिल्याचे दलालाने महिलेला सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर आपण मांस व मद्याचे सेवन करत नसून केवळ राहण्यासाठी घर हवे असल्याचे महिलेने संबंधितांना सांगितले. तरीदेखील मराठी व्यक्तींना घर देण्यास नकार असल्याची भूमिका घरमालकाने घेतल्याचे समोर आले आहे.या घटनेमुळे संतप्त झालेल्या महिलेने समाजमाध्यमांवर आपली व्यथा मांडली होती.

## कल्याणमध्ये सैराट! मुलीची निर्घृण हत्या

### आंतरजातीय विवाह केलेल्या गायत्रीला माहेरी बोलावलं अन्...

■कल्याण। प्रतिनिधी,




कल्याण पश्चिमेतील पारेकरवाडी परिसरातील रचना रॉयल इमारतीत घडलेल्या मुलीच्या हत्येच्या प्रकरणात बाजारपेठ पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन दिवसांपासून फरार असलेल्या आरोपी वडिलांना अटक केली आहे. चौकशीदरम्यान या हत्येमागील धक्कादायक कारण समोर आलंय. मुलीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या रागातून हे कृत्य केल्याची माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे.

**विवाहित मुलीला क्रूरपणे संपवलं**

पोलिसांच्या माहितीनुसार, विनोद वसईकर यांनी आपल्या विवाहित मुलगी गायत्री वसईकर हिची धारदार शस्त्राने हत्या केली होती. गायत्री लग्नानंतर काही दिवसांसाठी माहेरी आली होती. याच दरम्यान ही दुर्दैवी घटना घडली. हत्येनंतर विनोद वसईकर घटनास्थळावरून फरार झाले होते. घटनेची माहिती मिळताच बाजारपेठ पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत अखेर पोलिसांनी विनोद वसईकर यांना ताब्यात घेण्यात यश मिळवले. प्राथमिक चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, गायत्रीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध जाऊन इतर जातीतील तरुणाशी प्रेमविवाह केला होता. या विवाहाला तिच्या वडिलांचा तीव्र विरोध होता. मुलीसाठी त्यांनी यापूर्वी दोन वेळा साखरपुड्याची तयारी केली होती, मात्र गायत्रीने ते प्रस्ताव नाकारले होते. त्यानंतर तिने स्वतःच्या पसंतीने प्रेमविवाह केला.

**आंतरजातीय विवाह केल्याच्या रागातूनच बापाचं कृत्य**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर वडील आणि मुलगी यांच्यात याच विषयावरून पुन्हा वाद झाला. हा वाद हळूहळू तीव्र होत गेला आणि संतापाच्या भरात विनोद वसईकर यांनी धारदार शस्त्राने गायत्रीवर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गायत्रीचा जागीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर आरोपी वडील फरार झाले होते. मात्र पोलिसांनी तीन दिवसांच्या अथक शोधमोहीमेनंतर त्यांना अटक केली. चौकशीदरम्यान मुलीने आंतरजातीय विवाह केल्याच्या रागातूनच आपण हे कृत्य केल्याची कबुली त्यांनी दिल्याची माहिती तपास यंत्रणांकडून देण्यात आली आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास बाजारपेठ पोलीस करत असून आरोपी विनोद वसईकर यांना न्यायालयात हजर करण्यात आले असून त्याला 4 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या मास्टरमाईंड पी.व्ही. कुलकर्णीची 4 मजली इमारत भुईसपाट

■बीड। प्रतिनिधी,

देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने कारवाईचा वेग वाढविला दरम्यान, या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी म्हणून समोर आलेल्या सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्या बीड शहरातील मालमत्तेवरही प्रशासनाने कारवाई केली आहे. शहरातील शाहूनगर भागात सुरू असलेल्या त्याच्या चार मजली इमारतीच्या बांधकामावर अखेर हातोडा चालविण्यात आला आहे.




**त्याच ठेकेदाराने पाडले बांधकाम**

नगरपालिका प्रशासनाने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे ठेकेदाराला ते स्वतःहून पाडून घेण्याची नोटीस बजावली होती. या नोटीसीची मुदत संपल्यानंतर आजपासून प्रत्यक्ष पाडण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. विशेष म्हणजे संबंधित ठेकेदाराकडूनच हे बांधकाम हटविले जात आहे.

**कारवाईमागचे कारण काय ?**

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली होती. सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. त्यात पी. व्ही. कुलकर्णी याचे नाव समोर आल्यानंतर सीबीआयने त्यांना अटक केली होती. त्यानंतर त्यांच्या बीडमधील मालमत्तांचीही चौकशी सुरू झाली.

शाहूनगर येथील बांधकाम नियमबाह्य आढळून आल्याने पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून अनधिकृत बांधकाम हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याचा आता मोठा फटका कुलकर्णीर्ला बसल्याचे मानले जात आहे.

**नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थी आणि पालकांचेही नुकसान**

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी वर्षभर रात्रंदिवस मेहनत घेऊन प्रामाणिकपणे परीक्षेला सामोरे जातात. मात्र पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका फुटत असतील, तर त्याचा सर्वात मोठा फटका मेहनती विद्यार्थ्यांनाच बसतो. त्यामुळेच या घोटाळ्यातील आरोपींवर होत असलेल्या कारवाईकडे संताप आणि समाधान या दोन्ही भावनांनी पाहिले जात आहे. सीबीआयच्या तपासात पी. व्ही. कुलकर्णी हा प्रमुख सूत्रधार असल्याचे समोर आले असून त्याच्यासह आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे. काही आरोपी सीबीआय कोठडीत असून संपूर्ण रॅकेटचा तपास सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी देशभरातून होत आहे.

## चालकच निघाला चोर... ७.९७ लाखांचा मुद्देमाल जप्त

■कोल्हापूर। प्रतिनिधी,

फूड मॉल पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या चारचाकी वाहनातून सोन्याचे दागिने, रोकड आणि घड्याळ चोरी करणाऱ्या आरोपीला शाहूपुरी पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून तब्बल ७ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, फियार्दीसोबत प्रवास करणारा चालकच या चोरीमागे असल्याचे तपासात उघड झाले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मोहन आनंदराव आडागळे (६२) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताराबाई पार्क परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये मुक्कामासाठी आलेल्या फियार्दीच्या वाहनातून २५ मे रोजी अज्ञात व्यक्तीने सोन्याचे दागिने, रोकड आणि घड्याळ चोरी केले होते. याप्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या धाग्यावरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून तीन सोन्याच्या अंगठ्या (२० ग्रॅम), एक सोन्याची चेन (१० ग्रॅम), एक सोन्याचे ब्रेसलेट (२० ग्रॅम), दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे नाणे, स्कायम कंपनीचे घड्याळ आणि १२ हजार रुपयांची रोकड असा एकूण ७.९७लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## यांच्यासाठी सक्षम धोरणाची गरज



राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विषयावरून ठोस अंमलबजावणीपेक्षा पुन्हा राजकारण, आरोप-प्रत्यारोपच सुरू झाले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मागील अनेक दशकांपासून मध्यवर्ती प्रश्न राहिलेला असून अजूनही तो सुटलेला नाही. किंबहुना कुठल्याही सरकारने हा प्रश्न जाणीवपूर्वक सोडवला नाही. शेती, कर्जमाफीचा प्रश्न निसर्ग, सिंचनापेक्षा कृषीधोरणातील त्रुटींशी अधिक संबंधित आहे. कर्जमाफीच्या विषयावर दोन महत्त्वाचे दृष्टिकोन समोर येतात. एक म्हणजे शेतकऱ्यांना तातडीने मिळणारा आर्थिक व मानसिक दिलासा आणि दुसरा म्हणजे शेती क्षेत्राच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुधारणा करण्याची गरज, परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात आजपर्यंत यातील पहिल्याच विषयाला राजकीय सोयीसाठी आजपर्यंत महत्व देण्यात आले आहे. शेतकरी आणि कर्जमाफी या एकाच नाण्याच्या दोन बाजू राजकारणाने बनवल्या आहेत. त्यामुळे शेतीचा लाभदायक असा धोरणात्मक विचार कधीचाच मागे पडला आहे. शेतीसमोरील नैसर्गिक आव्हाने तर शेतीचा शोध लागल्यापासूनच आहेत, तरीही त्याचा कृषीसंवर्धनाच्या दृष्टीने तांत्रिक मूल्यांवर आधारित प्रयोगशील शेतीचा शेती आणि कर्जमाफीच्या दृष्टचक्रात कधीचाच मागे पडला आहे. शेती करायची तर ती कृषी उत्पादनासाठी नाही तर कर्जमाफीसाठी असा पायंडा पडला आहे. शेती, कर्ज आणि कर्जमाफी हा विषय केवळ राजकीय बनून राहिला आहे. केरळात यंदा मान्सून उशिराने दाखल होण्याची शक्यता आहे. त्यातही सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमानाचे संकेत आहेत. यंदा महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत कधी कोरडा दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि गारपीट यांसारख्या संकटांमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे लागवडीचा खर्चही निघणे कठीण होत असताना खरीप हंगामापूर्वी दरवर्षीप्रमाणे कर्जमाफीचा विषयही समोर आला आहे. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचा खर्च सातत्याने वाढत आहे यात इंधन दरवाढ, जागतिक युद्धाची झळही कारणीभूत आहे. त्यावर सरकारी आणि प्रशासकीय नियंत्रण कठीण असताना तात्पुरत्या अंतर्गत उपाययोजनांची गरज म्हणून कर्जमाफीकडे पाहिले जात आहे. यात शाश्वत शेतीचा विचार नाही, तसा तो कधीही नव्हताच, परंतु कृषीप्रश्नावर केवळ वरवरची मलमपट्टी करून शेतीला असलेला मूळ आजार वर्षानुवर्षे लपवला आणि दाबला जात आहे. शेतीमालाला बाजारात योग्य हमीभाव मिळत नसण्याला सरकारचे कृषीधोरणच प्रामुख्याने कारण आहे, सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकर्यांची दयनीय स्थिती हे याचेच उदाहरण आहे. कांद्याचे क्षेत्र वाढल्याने उत्पादन वाढणार हे कृषी विभागाच्या लक्षात आले नव्हते का? सरकारकडून कांद्याला पुरेसा हमीभाव मिळणार नाही, हे स्पष्ट असताना याविषयी आधीच उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत. कर्जमाफी ही शेतकऱ्याला दिलासा जरी असली तरी जोपर्यंत कृषीविषयी धोरणात्मक, अभ्यासपूर्ण दूरगामी धोरण असलेली उपाययोजना केली जात नाही, तोपर्यंत कर्ज आणि कर्जमाफीचे दुष्टचक्र भेदता येणार नाही. शेतकरी आत्महत्येमागील कारणांचा संवेदनशीलतेने शोध घेणे गरजेचे आहे, परंतु या संवेदनशीलतेआडून तातडीने जाहीर होणाऱ्या उपाययोजना शेतकऱ्यांना खरंच आर्थिक गर्तेतून बाहेर काढणाऱ्या ठरल्या आहेत का? दुर्दैवाने आजपर्यंतच्या अनुभवातून याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी सक्षम धोरण ठरवण्यात आपण अपयशीच झालेलो आहोत. कर्जमाफीमुळे शेतकऱ्याला एका हंगामासाठी दिलासा मिळतो, परंतु पुढील वर्षी पुन्हा निसर्गाची अवकृपा किंवा बाजारभावात घसरण झाल्यास शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत ढकलला जातो. वारंवार मिळणाऱ्या कर्जमाफीमुळे प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरू शकते आणि ग्रामीण भागातील 'कर्ज फेडण्याची जबाबदार परंपरा' कमकुवत होते, ज्यामुळे बँका भविष्यात नवीन पीक कर्ज देण्यास कचरतात. निवडणुकीआधी मतांसाठी कर्जमाफीची घोषणा केली जाते, परंतु कर्जमाफीतून राज्याच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक बोजा कसा संतुलित केला जाईल, याप्रश्नाचे गांभीर्य मतांच्या राजकीय बेगमीपुढे गौण असते. 'कर्जमाफीचे आश्वासन देऊन आता मते पदरात पाडून घेऊ, सत्ता आल्यावर पुढचे पुढे बघू' असेच वेळ मारून नेणारे कामचलावू धोरण त्यामागे असते. यामुळे शाश्वत शेतीसाठी कायमस्वरूपी उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टी, जसे की- सिंचन प्रकल्प, शीतगृहे, प्रक्रिया उद्योग आणि वीज पुरवठा यासाठी बजेट कमी पडणार आहे. त्याचा फटका फिरून पुन्हा शेती आणि शेतकऱ्यांनाच बसणार आहे. अनेक लहान आणि गरजू शेतकरी बँकांपेक्षा सावकारांकडून कर्ज घेतात. सरकारी कर्जमाफीचा फायदा प्रामुख्याने संस्थात्मक (बँक) कर्ज घेतलेल्यांना होतो, ज्यामुळे थेट सावकारी पाशात अडकलेला शेतकरी यातून वंचित राहतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची हीच बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, राज्य सरकारने नुकतीच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली आहे. या अंतर्गत 30 सप्टेंबर 2025 पर्यंत थकीत असर्णाया पात्र शेतकऱ्यांचे 2 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. तसेच नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना 50,000 रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदानही दिले जात आहे. कर्जमाफी ही एक तात्कालिक गरज ठरते. मात्र, शेती कायमस्वरूपी फायदेशीर करायची असेल, तर कर्जमाफीसोबतच शेतीमालाला योग्य भाव, सिंचनाची सोय, अचूक हवामान अंदाज आणि कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे या उपायांची गरज आहे. शेतकऱ्याला 'मागणी करणारा' नाही तर ह्यपुरवठादार आणि व्यावसायिक' बनवणे, हाच शेतकऱ्याला सक्षम करण्याचा एकमेव मार्ग आहे.

# इंधनटंचाई व पीक कर्जामुळे शेतकरी चिंतेत

इंधनाचे वाढलेले दर तसेच डिझेल टंचाईमुळे शेतकरी त्रस्त झाला आहे. यांत्रिकी शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना इंधन टंचाईचा फटका बसत आहे. दुसरीकडे राज्य शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी मे महिना संपत आलेला आहे. अद्याप शेतकऱ्यांची कर्जमाफी झालेली नाही. त्यामुळे नवीन पीक कर्ज मिळत नाही. खरीप हंगाम तोंडावर असल्याने खते, बी-बियाणे खरेदी कशी करावी या चिंतेत शेतकरी आहेत. मराठवाड्यात कोरडवाहू शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. शेतकरी कुठल्या ना कुठल्या अडचणीत सापडत असल्याने तो निसर्गचक्राला कंटाळला आहे. यामुळे शेतकरी जगण्यापेक्षा मृत्यूला कवटाळत आहे. मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. शासन सर्वतोपरी प्रयत्न करूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. जूनअखेर शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्याचे मुख्यमंत्र्याकडून स्पष्ट करण्यात आले. शासनाच्या किचकट अटी व अनेक नियमांमुळे ५०% शेतकरी कर्जमाफीच्या लाभांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या दुःखाला सत्ताधाऱ्यांनी समजून घेतले पाहिजे, अशी अपेक्षा मराठवाड्यातील शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

मराठवाड्यात जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांच्या कालावधीत तब्बल २९३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती हाती आली आहे. शेतकऱ्यांना विविध अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. वाढलेले कर्ज, शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. काही दिवसांपासून मराठवाड्यात इंधन टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या अक्षरशः पेट्रोल पंपावर रांगा व हाणामारीचे प्रकार घडत आहेत. हिंगोली व परभणी जिल्ह्यात तर अक्षरशः रात्रभर शेतकऱ्यांना डिझेलसाठी कॅन घेऊन उभे राहावे लागत आहे. डिझेल मिळत नसल्याने यांत्रिकी शेतीचा काहीही फायदा नाही हे लक्षात घेऊन शेतकरी पुन्हा बैल जोडी खरेदी करण्यावर भर देत आहेत. मराठवाड्यात यावर्षी जानेवारी महिन्यापासून एप्रिल अखेरपर्यंत सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या आहेत. बीड जिल्ह्यात चार महिन्यांत तब्बल ७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. निसगार्चा बेभरवसा व कर्ज हे दोन आत्महत्येमागील प्रमुख कारणे आहेत. सन २०१२ ते २०१६ या काळात मराठवाड्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ झाल्याचे शासकीय दप्तरी असलेल्या नोंदीवरून स्पष्ट होत आहे.

मराठवाड्यातील प्रमुख जिल्हा असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून ४ महिन्यांत या जिल्ह्यात ७१ शेतकऱ्यांनी फास लावून घेतला आहे. धाराशीव जिल्ह्यात ३९, नांदेड जिल्ह्यात ३३, परभणी जिल्ह्यात २४, हिंगोली जिल्ह्यात १८, जालना जिल्ह्यात २२, लातूर जिल्ह्यात १३ शेतकऱ्यांनी अलीकडच्या चार महिन्यांत आत्महत्या केल्या आहेत. मराठवाड्यातील बीड जि ल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्याठिकाणी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा क्रमांक लागतो. बीड जिल्ह्यात चार महिन्यांत तब्बल ७३ शेतकऱ्यांच्या आत्महत्या असून यापैकी २० शेतकरी शासकीय मदतीस पात्र ठरले आहेत, तर ४५ शेतकऱ्यांची प्रकरणे चौकशीस पात्र आहेत. आठ शेतकऱ्यांची प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत, तर १९ शेतकऱ्यांना आतापर्यंत शासकीय मदत देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत एकूण ७१ जणांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी २० जणांना शासकीय मदत देण्यात आली, तर उर्वरित ४० प्रकरणे प्रशासकीय स्तरावर चौकशीकरिता प्रलंबित आहेत. यापैकी दोन प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मागील पाच वर्षांमध्ये चिंताजनकरीत्या वाढले आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांपैकी तब्बल ३५ टक्के कुटुंबे शासकीय आर्थिक मदतीपासून वंचित राहत असल्याची धक्कादायक परिस्थिती समोर आली आहे. प्रशासन, पोलीस आणि महसूल यंत्रणेच्या उदासीनतेचा फटका थेट शेतकरी कुटुंबांना बसत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. शासनाकडून विविध योजना, कर्जमाफी, अनुदान आणि मदतीच्या घोषणा होत असतानाही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसल्याने कृषी धोरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विवि ध कारणांनी अपात्र केलेल्या आत्महत्या कुटुंबांची चिंता वाढवत आहेत.

शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक प्रकरणांमध्ये पोलीस पंचनामा, महसूल चौकशी, कजार्चा पुरावा किंवा इतर तांत्रिक कारणे पुढे करून कुटुंबांना अपात्र ठरवले जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, आधीच कर्ता पुरुष गमावलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. काही प्रकरणांमध्ये विनाकारण मद्यपी असल्याचा शिक्का देखील मारला जात असल्याची दुदैर्वी परिस्थिती आहे

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्याने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. राज्यशासन कर्जमाफी करणार असून या विधान परिषदेच्या निवडणुकांमुळे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला उशीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वेगवेगळ्या चक्रव्यूहात अडकलेल्या शेतकऱ्यांना आता कर्जमाफी तोंडावर असताना इंधनाचे वाढलेले दर व डिझेल टंचाईचा फटका बसत आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेची आडकाठी आली, तर शेतकरी नवीन पीक कर्ज घेण्यापासून वंचित राहू शकतो. शेतकरी वर्ग सध्या मशागतीच्या कामात लागलेला आहे; परंतु शेतकरी पूर्णपणे यंत्रावर अवलंबून असल्याने डिझेलचा फटका अनेक शेतकऱ्यांना बसत आहे. इंधनाची कमतरता शेतकऱ्यांना भेडसावत आहे. यामुळे खरीप हंगामावर चांगलाच परिणाम जाणवणार आहे. शेतमाल बाजारात पोहोचविणे महाग होऊन बसले आहे.




मराठवाड्यातील शेतकरी सध्या निसगार्चा बेभरवसा, डिझेल-पेट्रोलची तीव्र टंचाई, वाढलेले इंधन दर आणि रखडलेली कर्जमाफी अशा अनेकविध संकटांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. खरीप हंगाम तोंडावर आलेला असतानाच मशागतीसाठी लागणारे डिझेल मिळेनासे झाले आहे, तर दुसरीकडे नवीन पीक कर्ज न मिळाल्याने खते आणि बी-बियाणे खरेदी कशी करावी, या चिंतेने बळीराजा ग्रासला आहे. प्रशासकीय उदासीनता आणि आचारसंहितेची आडकाठी यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, मराठवाड्यात विशेषतः बीड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्यांचा आकडा चिंताजनकरीत्या वाढत आहे.

# युद्धात भारताची होरपळ

**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघषार्चा फटका भारतातील सामान्य नागरिकांना बसत असून पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीचे दरही सातत्याने वाढत आहेत. इंधन दरवाढीमुळे सामान्य माणसाचा घरखर्च कोलमडत चालला आहे. युद्ध लांबत गेले तर भारतासारख्या इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोरील आर्थिक संकट आणखी भीषण होण्याची शक्यता आहे.**

अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धामुळे इंधनाची सातत्याने दरवाढ होत आहे. पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीच्या दरातही १० दिवसांमध्ये चौथ्यांदा वाढ झाली आहे. इंधनात दरवाढ झाली की, महागाई आपोआप वाढते. महागाईवर नियंत्रण ठेवणे कोणालाच शक्य नाही. युद्धबंदीच्या चर्चा होतात, पुन्हा हल्ले होतात. यामुळे इंधनासाठी अवलंबून असलेले भारतासारखे देश होरपळून चालले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ या देशांवर आली आहे. युद्धाबाबत अमेरिका व इराण कोणीही लवचिक भूमिका घेत नसल्याने युद्ध लांबण्याची शक्यता आहे. जगात कुठेही युद्ध पेटले की त्याची राख सर्वप्रथम सामान्य माणसाच्या चुलीवर पडते. आज नेमके तेच घडत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या संघषार्ने संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलले आहे. युद्धाच्या बातम्या टीव्हीवर दिसतात, क्षेपणास्त्रांचे आवाज मध्यपूर्वेत घुमतात; पण त्याचे भारतासारख्या विकसनशील देशांना चटके बसतात. कारण युद्ध जिथे होते, तिथे फक्त बॉम्ब पडत नाहीत, तर त्यासोबत जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडते. तेलाच्या किमती उसळतात, डॉलर मजबूत होतो, आयात खर्च वाढतो आणि त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या खिशाला बसतो.

भारत आजही मोठ्या प्रमाणावर इंधनासाठी परदेशांवर अवलंबून आहे. कच्च्या तेलाची आयात थांबली किंवा दर वाढले की संपूर्ण अर्थचक्र हादरते. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता सीएनजीचे दरही दहा दिवसांत चौथ्यांदा वाढले आहेत. ही केवळ आकड्यांची वाढ नाही, तर ती सामान्य नागरिकांच्या जगण्यावर चाललेली आर्थिक चढाई आहे. रोज सकाळी पेट्रोल पंपावर दर बदलतात आणि त्याच वेगाने बाजारातील वस्तूंचे भाव वाढतात. भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन या सर्वच क्षेत्रांवर या इंधन दरवाढीचा परिणाम होतो.

महागाई ही केवळ आर्थिक संज्ञा नाही; ती गरिबाच्या थाळीतून कमी होणारी भाकरी आहे. जेव्हा इंधन महाग होते, तेव्हा ट्रकचे भाडे वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा भार शेवटी ग्राहकावर टाकला जातो. त्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाते. सरकार कितीही आश्वासने देत असले, तरी वास्तव असे आहे की, इंधन दरवाढ झाली की महागाईला लगाम घालणे जवळपास अशक्य बनते. आज भारतातील मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग अक्षरशः तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पगार वाढत नाहीत, रोजगाराची स्थिती स्थिर नाही, पण खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये कामावर जाणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यापासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकजण या महागाईच्या आगीत भाजत आहे.

या सर्व परिस्थितीमागे मध्यपूर्वेतील युद्धजन्य वातावरण मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्याला इराणकडून मिळणारे प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. युद्धबंदीच्या चर्चा होतात, शांततेच्या घोषणा केल्या जातात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा हल्ले सुरू होतात. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. तेल उत्पादक प्रदेशात तणाव वाढला की कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत भीती निर्माण होते आणि लगेच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढतात. अमेरिकेला तिची महासत्ता टिकवायची आहे, इस्त्रायलला स्वतःची सुरक्षा सिद्ध करायची आहे आणि इराणला झुकायचे नाही. या तीन शक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात भारतासारख्या देशांची आर्थिक कोंडी होत आहे. युद्धात सहभागी नसतानाही भारताला त्याची किंमत मोजावी लागत आहे. कारण भारताकडे तेलाचे प्रचंड साठे नाहीत. देशाला ऊर्जा हवी असेल, उद्योग चालवायचे असतील, वाहतूक सुरळीत ठेवायची असेल तर आयात केलेल्या तेलावर अवलंबून राहावेच लागते.

युद्ध जितके लांबेल, तितका भारतावरचा आर्थिक दबाव वाढणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाला की, आयात अधिक महाग होते. सरकार कर कमी करून नागरिकांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न करू शकते; पण त्यालाही मर्यादा आहेत. कारण सरकारलाही महसूल हवा असतो. परिणामी सामान्य नागरिक दोन्हींकडून भरडला जातो, एकीकडे महाग इंधन आणि दुसरीकडे वाढती महागाई. आज परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, लोकांच्या आर्थिक नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे.

सीएनजी दरवाढीचा सर्वात मोठा फटका रिक्षाचालक, टॅक्सीचालक आणि छोट्या वाहतूक व्यावसायिकांना बसत आहे. त्यांचे उत्पन्न वाढत नाही; पण खर्च मात्र प्रचंड वाढतो आहे. शेवटी तेही भाडेवाढ करतात आणि त्याचा भार पुन्हा सामान्य माणसालाच सहन करावा लागतो. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या संकटावर कोणाकडेही ठोस उपाय दिसत नाही. युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निष्प्रभ ठरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठका होतात, निवेदने दिली जातात; पण प्रत्यक्षात युद्धबंदी घडताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोघेही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. इस्त्रायलची भूमिका देखील अधिक आक्रमक होत चालली आहे. त्यामुळे हा संघर्ष दीर्घकाळ सुरू राहण्याची भीती वाढत आहे.

भारताने आता या परिस्थितीकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहून चालणार नाही. दीर्घकालीन ऊर्जा धोरण अधिक मजबूत करावे लागेल. पयार्यी ऊर्जा स्रोत, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार, सौरऊर्जा, जैवइंधन आणि स्थानिक ऊर्जा उत्पादन यावर आक्रमक गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय युद्धानंतर भारताला अशाच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागेल. जगातील महासत्ता आपापल्या राजकीय आणि सामरिक स्वाथार्साठी संघर्ष करत राहतील; पण त्याची किंमत भारतातील सामान्य माणूस रोज पेट्रोल पंपावर, बाजारात आणि घरखर्चात चुकवत राहणार आहे. हे युद्ध फक्त मध्यपूर्वेत सुरू नाही, तर ते भारतातील प्रत्येक घराच्या अर्थसंकल्पावर चालले आहे. इंधन दरवाढ आणि महागाईच्या रूपाने सामान्य नागरिक रोज या युद्धाचे घाव सहन करत आहे आणि जर अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांनी आपली आक्रमक भूमिका बदलली नाही, तर येणारे दिवस आणखी भयावह ठरू शकतात.

# एसटीला हवे आर्थिक बळ!

खेड्यापाड्यातील धुळीच्या रस्त्यावरून, वळणावळणाच्या घाटातून हॉर्नचा तो ओळखीचा आवाज येतो आणि मनात विश्वास आणि आश्वस्तता दाटून येते. ती येते. गडद लाल पार्श्वभूमीवर पांढऱ्या अक्षरात लिहिलेलं असतं , 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.' आपण तिला मायेने म्हणतो- 'आपली एसटी' किंवा 'लाल परी'. आज, एक जून रोजी 'एसटी'चा ७८वा वर्धापन दिन आहे. हा प्रवास फक्त एका वाहतूकसेवेचा किंवा महामंडळाचा नाही, तर तो महाराष्ट्राच्या जडणघडणीचा, संस्कृतीचा आणि कोट्यवधी मराठी माणसांच्या भावभावनांचा इतिहास आहे.

ही एसटी म्हणजे केवळ एक वाहतुकीचे साधन नाही, ते महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे 'काळीज' आहे. पहाटेच्या पहिल्या गाडीने डोक्यावर भाजीपाल्याची पाटी घेऊन बाजारात जाणारा शेतकरी असो, वा दुधाचे कॅन घेऊन शहरात जाणारा दुधवाला; एसटीने कित्येक संसार उभे केले. अनेक नेतेमंडळी, मोठ्या पदावरचे अधिकारी, बडे व्यावसायिक जेव्हा अभिमानाने सांगतात, 'मी पहिल्यांदा एसटीनेच प्रवास केला. शाळेतही एसटीनेच गेलो, शहरात कॉलेजासाठी गेलो तेव्हा माझे डबे एसटीनेच पोहोचले,' तेव्हा एसटीचे योगदान अधोरेखित होते. ग्रामीण भागातील लाखो मुलींना शिक्षणाची दारे एसटीच्या मोफत किंवा सवलतीच्या पासनेच खुली करून दिली. दिवाळीचा पाहुणचार असो, लेकीचं माहेरपण असो वा गणपती-बाप्पाच्या दर्शनाची ओढ, एसटीच्या प्रवासाने महाराष्ट्राला एका धाग्यात बांधून ठेवलं आहे.

पण काळ बदलला. जागतिकीकरण आले आणि रस्त्यांवर खासगी वाहनांची भाऊगर्दी झाली. प्रवासाचे नवनवीन पर्याय उपलब्ध झाले आणि हळूहळू आपल्या हक्काची एसटी जरा बाजूला पडली! मुळात एसटी 'ना नफा ना तोटा' या उदात्त संकल्पनेवर आणि सूत्रावर सुरू झाली होती. तिचा उद्देश नफा कमविणे नव्हता, तर शेवटच्या माणसापर्यंत सेवा पोहोचवणे हा होता; पण आज परिस्थिती 'बुडत्याचा पाय खोलात' अशी झाली आहे. आज एसटी महामंडळाला दररोज सुमारे अडीच कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. जाणकारांच्या मते, येत्या १५ जूननंतर जेव्हा उन्हाळी हंगामातील तात्पुरती भाडेवाढ बंद होईल, तेव्हा हा दैनंदिन तोटा थेट किमान पाच कोटी रुपयांवर जाऊन पोहोचेल. आज महामंडळाचा एकूण संचित तोटा १२ हजार कोटी रुपयांच्या पार गेला असून, सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांची वैधानिक देणी रक्कम थकीत आहे.

या परिस्थितीत एक मोठी खंत मनाला सलते. महाराष्ट्र सरकार एका बाजूला महावितरणला कर्ज फेडण्यासाठी अर्थसंकल्पात तब्बल ३२ हजार ६७९ कोटी रुपयांची प्रचंड मोठी रक्कम देण्याचा निर्णय घेते; पण दुसऱ्या बाजूला राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटीला मात्र केवळ दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूतीर्ची रक्कम दिली जाते. हा निर्णय कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला छेद देणारा नाही का? एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला वेगळा न्याय असा दुजाभाव न करता गोरगरिबांच्या एसटीलाही अशाच प्रकारे अर्थसाहाय्य दिले पाहिजे. कठीण प्रसंगी एसटीला सुद्धा एकवेळचा पर्याय म्हणून सरकारने भरीव आर्थिक मदत केली, तरच तोट्यातील एसटी वाचू शकेल; अन्यथा हा डोलारा कोणत्याही क्षणी कोलमडून पडेल.

सध्या एसटी महामंडळावर असलेल्या थकीत देण्यांचा आकडा अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे. यामध्ये प्रामुख्याने भाडे तत्त्वावरील बसची ११० कोटी रुपयांची देणी, ११०० कोटींचा उपदान निधी विश्वस्त मंडळ अंशदान, १४०० कोटींचे भविष्य निर्वाह निधी अंशदान व वर्गणी; तसेच ११५० कोटींचा प्रवासी कर थकीत आहे. याव्यतिरिक्त डिझेलची ११५ कोटींची देणी, ८० कोटींची भांडार खरेदी व पुरवठादार देणी, ६० कोटींची रजा रोखीकरण रक्कम, ३८ कोटींची विमा निगडित वर्गणी, नऊ कोटींचा वैद्यकीय व प्रवास भत्ता आणि ५० लाख रुपयांची अपघात साहाय्यता रक्कम प्रलंबित आहे. त्याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, एप्रिल २०१६ पासून कर्मचाऱ्यांचा तब्बल १२०० कोटी रुपयांचा महागाई भत्ता फरक व वाढीव महागाई भत्ता प्रलंबित आहे. वाढीव घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ फरकाची रक्कम सुद्धा प्रलंबित असून, साधारण सहा ते सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत देणी रक्कम प्रलंबित आहेत.

एसटीला तोट्याच्या गर्तेत ढकलण्यात डिझेलच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांचा मोठा वाटा आहे. मे २०२६ मधील आकडेवारी पाहिली तर समजेल की एसटीच्या खिशाला किती मोठी कात्री लागत आहे. १५ मे २०२६ रोजी महामंडळाचा डिझेलचा सरासरी दर रु. ९१.३१ प्रतिलिटर होता, तो १९ मे रोजी रु. ९२.२६ झाला, २३ मे रोजी रु. ९३.१९ वर पोहोचला आणि २५ मे २०२६ रोजी हा सरासरी दर तब्बल रु. ९६.०० प्रतिलिटर इतका झाला. केवळ १० दिवसांत सरासरी दरात ६.३५ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबई, नांदेड, कोल्हापूर, नागपूर, अमरावती आणि नाशिक या प्रमुख विभागांमधील आकडेवारी पाहिली तर पूर्वीच्या भाडेवाढीच्या तुलनेत प्रत्यक्षात प्रतिलिटर तब्बल ६.३५ ते ६.३६ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबईत दर ८८.२१ रुपयांवरून ९४.५७ वर गेला, नांदेडमध्ये ९१.४४ वरून ९७.८ वर तर कोल्हापुरात ८९.१५ रुपयांवरून ९५.५ रुपयांवर गेला. नाशिक, नागपूर आणि अमरावतीमध्येही हीच परिस्थिती आहे. एसटीला डिझेल खरेदी करण्यासाठी वर्षाला सरासरी अंदाजे ३ हजार ४०० कोटी रुपये इतकी रक्कम खर्च होत असून त्यात दरवाढीमुळे दिवसाला सुमारे ७० लाख रुपये इतका खर्च वाढला आहे. गेल्या वर्षी जानेवारीत १५.९५ टक्के व आता या उन्हाळी हंगामात १० टक्के अशी एकूण २५ टक्के भाडेवाढ करूनही डिझेलच्या भडक्यामुळे तसेच नीट व्यवस्थापन व नियोजन नसल्याने एसटीचा तोटा कमी होत नाही. या वर्षीच्या एप्रिल महिन्यात प्रति किलोमीटरला एसटीला ४ रुपये ८० रुपये इतका तोटा झाला असून चक्क ७६ कोटी ४७ लाख रुपये इतका मोठा तोटा सहन करावा लागला आहे. त्यात मे व जून महिन्यात अजून भर पडेल असे दिसत आहे.

उत्पन्नवाढीसाठी कठोर निर्णय घेण्याची गरज आहे; पण या आव्हानाला तोंड देण्यासाठी व्यवस्थापन कमी पडत आहे. उत्पन्नाचे अन्य स्रोत निर्माण केले पाहिजेत. पण तसे होताना दिसत नाही. एसटीकडे मोठ्या प्रमाणात पडीक जमिनी असून त्यांचा विकास करून निधी उपलब्ध होईल. जागा विकसित करण्याच्या घोषणा केल्या आहेत; पण त्याची गती मंद आहे. एसटीत कर्मचाऱ्यांच्या मोठ्या संख्येने जागा रिक्त आहेत. मात्र, कायमस्वरूपी भरती करण्यास सरकारने मंजुरी दिलेली नाही. त्यामुळे सेवेतील कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण आहे. त्याचा परिणाम उत्पन्नावर झाला आहे. त्यांचा हक्काचा महागाई भत्ता आणि वेतनवाढ रखडली आहे.

सरकारने अर्थसंकल्पात एसटीसाठी २०२६-२७ या वषार्साठी ३६७८ कोटींची तरतूद केली खरी; पण दुदैर्वाने ही

# नियमित करा केवळ १५ पुश अप
## वजन कमी होण्यासह मिळतील भरपूर लाभ

शरीर निरोगी आणि सुदृढ राहण्यासाठी पौष्टिक आहारासोबतच शारीरिक व्यायाम करणं देखील गरजेचं आहे. व्यायामामुळे शरीर फिट राहण्यासोबतच आपलं आजारांपासून संरक्षण होण्यासही मदत मिळते. नियमित एक तास व्यायाम केल्यास शारीरिक क्षमताही वाढते. फिटनेससाठी लोक कित्येक प्रकारचे व्यायाम करतात. काही जण योगासने करतात तर काही जिममध्ये जातात. काही जणांना घरातच सोप्या व्यायामांचा सराव करायला आवडतं. जिममध्ये जाऊन एक्सरसाइझ करणं शक्य नसल्यास तुम्ही घरातच 'पुश अप्स' करू शकता. पुश अप्समुळे शरीराला भरपूर लाभ मिळतात. फिटनेस ट्रेनर्स आणि बॉडी बिल्डर्सच्या मते हा व्यायाम नियमितकेल्यास आपलं शरीर फिट राहण्यासाठी बरीच मदत मिळते. पण कोणताही शारीरिक व्यायामाचा सराव करण्यापूर्वी ट्रेनरकडून प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे, ही गोष्ट लक्षात ठेवा. जाणून घेऊया पुश अप्समुळे शरीराला होणारे फायदे

**शरीराची कार्यक्षमता वाढते**

नियमित पुश अप्स केल्यानं आपल्या शरीराच्या कार्यक्षमतेमध्ये प्रचंड वाढ होते. पुश अप्स केल्यानं शरीराच्या जवळपास सर्वच अवयवांचा व्यायाम होतो. यामुळे शरीरातील आळस कमी होतो आणि शरीर अधिक सक्रिय स्वरुपात कार्य करू लागते. एक आठवडा नियमित हा व्यायाम प्रकार करून तुम्ही स्वतःचा याचा अनुभव घेऊ शकता.

**व्यायाम करण्याची पद्धत**

- पुश अप हा एक साधा आणि सोपा व्यायाम प्रकार आहे. हा व्यायाम करताना आपलं शरीर जमिनीशी समांतर ठेवावे.
- दोन्ही हात जमिनीवर ठेवावे. पाय गुडघ्यामध्ये वाकवू नये.
- यानंतर शरीर वरील आणि खालील बाजूस न्यावे. हा व्यायाम तुमच्या क्षमतेनुसारच करावा.
- या व्यायामामध्ये हात आणि पायांच्या पंज्यांवर संपूर्ण भार येतो.
- पुश अपमुळे स्नायू पेशी, खांदे आणि ट्राइसेप्स मजबूत होतात. शिवाय शरीराची क्षमताही वाढण्यास मदत मिळते.

**हृदयाची कार्यप्रणाली चांगली राहते**

हृदयाशी संबंधित कार्यप्रणाली चांगली राहण्यासाठी पुश अप्स करणं अतिशय लाभदायक ठरू शकतं. पुश अप्स केल्यानं आपल्या छातीच्या भागातील स्नायूंना चांगला ताण मिळतो आणि यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत सुरू राहते. रक्तवाहिन्यांसाठी हा चांगला व्यायाम आहे. योग्य पद्धतीनं पुश अप्स केल्यानं शरीरामध्ये रक्त प्रवाह नीट सुरू राहतो. यामुळे हृदयाशी संबंधित विकारांचा धोका देखील कमी होतो. पुश अप्स करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. याची सविस्तर माहिती आपल्या ट्रेनरकडून घ्यावी. त्यानंतरच सराव करावा.

**खांदे होतात मजबूत**

- पुश अप्स केल्यानं खांदे बळकट होतात. शरीराचा बांधा देखील सुडौल राहण्यास मदत मिळते. शरीराचा बांधा आकर्षक आणि सुंदर दिसावा, यासाठी अन्य व्यायाम प्रकार देखील आहेत. पण यासाठी पुश अपमुळे तुम्हाला जास्त मदत मिळू शकेल. या व्यायामामुळे खांद्यांना दुखापत होण्याची भीतीही कमी असते.
- पण चुकीच्या पद्धतीनं व्यायाम केल्यास मान, पाठ, पोट आणि मनगटामध्ये वेदना होण्याची शक्यता असते.
- हा त्रास टाळण्यासाठीच ट्रेनरच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करावा.

**कमरेसाठी चांगला व्यायाम**

- एखादी जड वस्तू उचलल्यानं किंवा अचानक पडल्यानंतर कमरेच्या दुखापती होण्याची शक्यता असते. पुश अप्स केल्यानंतर तुमची पाठ आणि कमरेचे स्नायू मजबूत होण्यास मदत मिळते.
- पाठदुखी, कंबरदुखीचा त्रास होऊ नये, यासाठी फिटनेस रूटीनमध्ये तुम्ही पुश अप्सचा समावेश करू शकता.
- यामुळे पाठ आणि कमरेच्या स्नायूंचा चांगला व्यायाम होतो.
- यामुळे शरीरातील आळस देखील कमी होतो.
- पाठ आणि कंबरदुखीच्या समस्या निर्माण होऊ नये, यासाठी आपल्या जीवनशैलीमध्येही काही बदल करणे गरजेचं आहे.

**वजन कमी करण्यासाठी**

- शरीराचे वाढलेले वजन कमी करण्यासाठी नको-नको त्या उपचारांची मदत घेतली जाते. पण वजन काही नियंत्रणात येत नाही. नियमित पुश अप्स केल्यास ही समस्या दूर राहण्यासाठी नक्कीच मदत मिळेल.
- सुरुवातीला तुमच्या क्षमतेनुसार व्यायाम करा. यानंतर ट्रेनरच्या मदतीनं पुश अप्स करण्याची संख्या हळूहळू वाढवा. काही दिवसांनी स्वतःच्या शरीरामध्ये सकारात्मक बदल पाहिल्यानंतर तुम्हाला प्रेरणा मिळेल.
- यामुळे शारीरिक ऊर्जा वाढण्यासही मदत मिळते.
- व्यायामासोबतच आहारामध्ये पौष्टिक पदार्थांचा समावेश करा.
- जर तुम्हाला जमिनीवर पुश अप्स करणं कठीण जात असेल. तर तुम्ही उभे राहून भिंतीवर हात टेकवूनही स्टँडिंग पुश अप्स करू शकता.





# मुलांची काळजी घेताना पालकांनी 'या' चुका टाळा

मुलांना समजून घेणं थोडं अवघड असतं असं म्हटलं जातं. त्यामुळेच त्याच्यावर योग्य संस्कार करताना काळजी घेण्याची गरज असते. मुलांना समजावण्याची प्रत्येक पालकांची पद्धत ही वेगवेगळी असते. मात्र त्यांना शिकवताना पालकांच्या काही चुका त्यांनाच महागात पडू शकतात. मुलांवर त्याचा वाईट परिणाम होतो. तसेच ते नकारात्मक विचार करायला लागतात. त्यामुळेच मुलांची काळजी घेताना, त्यांच्यावर संस्कार करताना पालकांनी कोणत्या चुका टाळाव्यात हे जाणून घेऊया.

**मुलांवर सारखं रागावणं**

लहान मुलांकडून काही चुका होत असतात. मात्र त्यामुळे त्याच्यावर रागावण्याची काही पालकांना सवय असते. मुलांना सातत्याने रागावू नका. यामुळे त्यांचा स्वभाव चिडचिडा होईल. तसेच मुलं पालकांना घाबरू न खोटं बोलण्याची शक्यता असते.

**प्रेम न करणं**

पालकांचं मुलांवर खूप प्रेम असतं. मात्र मुलं लाडावली जाऊ नयेत म्हणून ते व्यक्त करत नाहीत. पण तुमचं मुलांवर असलेलं प्रेम व्यक्त करा. त्यांचे लाड करा. मुलांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. यामुळे आई-वडील आणि मुलांमधील नातं आणखी घट्ट होईल.

**दुसऱ्यांसमोर ओरडणं अथवा मारणं**

मुलांना चांगली शिस्त लागावी म्हणून पालक मुलांना ओरडतात तर कधी कधी मारतात. मात्र दुसऱ्या व्यक्तींसमोर मुलांना रागावू नका. तसेच त्यांना मारू नका. यामुळे मुलांना अधिक वाईट वाटू शकतं आणि पालकांचा राग येऊ शकतो.

**प्रोत्साहन न देणं किंवा कौतुक न करणं**

लहान मुलांना वेगवेगळ्या गोष्टी करण्याची सवय असते. त्यांना प्रोत्साहन द्या. जेणेकरून त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळेल. तसेच मुलांनी एखादी चांगली गोष्ट केली तर त्याचे कौतुक करा.

**दुसऱ्यांसोबत तुलना करू नका**

अनेक पालकांना आपल्या मुलाची तुलना दुसऱ्या मुलांसोबत करण्याची सवय असते. पण असं करू नका. लहान मुलं निरागस असतात. त्यांच्या मनावर याचा वाईट परिणाम होऊ शकतो.

# आजकाल मेंदूचे आजार व अस्वस्थता

आजकाल मेंदूचे आजार किंवा अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत असल्याचे मला जाणवत आहे. तुमचा मेंदू दिवसातील ८ तास, आठवडयातील सात दिवस आणि वर्षातील ३६५ दिवस अविरत कार्य करीत असतो. त्यामुळे तो स्वस्थ राहणे फार गरजेचे आहे. त्याचे हे स्वास्थ्य पाच गोष्टींवर अवलंबून आहे.

**सामाजिक बांधिलकी :**

अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा मानवाच्या आहेत, पण? त्याचप्रमाणे मेंदूची अधोगती रोखण्यासाठी सामाजिक बांधिलकी महत्त्वाची आहे. सामाजिक बांधिलकीला धोका निर्माण झाल्यावर किंवा त्याला धक्का लागल्याने होणारे परिस्थितीतील बदल तसेच सामाजिक अनुभव याच्या आधारे तुमची मानसिक जडणघडण होत असते. ग्लोबल कौन्सिल ऑन ब्रेन हेल्थच्या अहवालानुसार मित्रपरिवार, कुटुंब आणि सामाजिक कार्यामधील सहभाग यामुळे आपला मेंदू निरोगी राहतो. याचसाठी क्लब, क्लास किंवा सामाजिक संस्था/संघटनांशी जोडले जाणे गरजेचे आहे, जेणेकरून नव्या ओळखी होऊ शकतील. आपल्याला आनंदी ठेवणारे नातेसंबंध तसेच कार्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. तुमचे नातेसंबंध तुटले असतील, तर त्याच व्यक्तीशी किंवा नव्या व्यक्तीशी ते नव्याने तयार करण्यासाठी प्रयत्न करा.सामाजिक नेटवर्क जर मजबूत असेल, तर सहकार्यांचे हात जास्त मिळतात, तणाव कमी होतो, नैराश्यावर मात करता येते आणि बौद्धिक उत्तेजना वाढते. जो समाज जीवनात जेवढा व्यस्त असतो, त्याची बौद्धिक हानी कमी होते, असे पाहणीत आढळले आहे. जे लोक मनापासून सतत क्रियाशील असतात आणि इतरांशी संवाद साधून असतात, त्यांचे आयुष्य आनंदी आणि स्वास्थ्यपूर्ण असते.

**शारीरिक व्यायाम:**

शारीरिक व्यायामामुळे तुमचे आयुर्मान वाढते, तुमचा चांगला मूड राहतो, तुमची झोप व्यवस्थित होते आणि वजनही घटवते, हृदयविकाराचा धोका कमी करते तसेच तुमची हाडे आणि मेंदू निरोगी ठेवते. तुमचा मेंदू हा शरीरातील सकयूंप्रमाणेच असतो, एकतर त्याचा वापर करा किंवा तो गमवा. धावणे, जॉगिंग, पोहणे किंवा सायकलिंग हे नियमित केल्यावर नव्या मेंदू पेशींची वाढ होण्यास चालना मिळते तसेच अस्तित्वात असलेल्या पेशी सुरक्षित राहतात. दिवसातून किमान २० मिनिटे व्यायाम केला, तर बुद्धी तल्लख होण्यास मदत होते.

**पौष्टिक अन्न :**

पौष्टिक आणि संतुलित आहार मेंदूला चालना देतो. धान्य, हिरव्या भाज्या आणि पालेभाज्या, ऑलिव्ह, मासे आणि ड्रायफ्रूट्स यांचा आहारात समावेश केल्यास, मेंदू निरोगी राहतो आणि अल्झायमरसारख्या आजाराचा धोकाही कमी होतो. ताजे अन्न शिजवा आणि खा, चविष्ट अन्नावर भर द्या, तसेच मित्रपरिवार आणि कुटुंबाबरोबर जेवणाचा आनंद घ्या. मेंदूसाठी योग्य अशा अमेगा-साठी मासे खाणे खूप फायदेशीर आहे. मासे खात नसाल, तर अक्रोड तसेच अळशी, अंबाडी, जवस किंवा सोयाबिन्सचा वापर करता येईल. पालक, ब्रोकोली यांसारख्या हिरव्या पालेभाज्या यांच्याबरोबरच फळांचा आहारात समावेश करावा. ब्लूबेरी, रास्पबेरी, ब्लॅकबेरी तसेच डार्क चॉकलेट आणि हळद, दालचिनी आणि आले यांसारखे मसाले तसेच औषधी वनस्पती यांच्यात चांगल्या प्रमाणात अँटिऑक्सिडन्ट्स असते. ज्यामुळे मेंदूला चांगल्या प्रकारे रक्तपुरवठा होतो. अक्रोड हे हृदयाच्या स्वास्थ्यासाठी जेवढे उपयुक्त आहे, तेवढेच मेंदूसाठीही महत्त्वाचे आहे. याच्यामुळे आकलनशक्ती वाढते, तर धान्य स्मृती चांगली ठेवण्यास मदत करतात.

**निद्रा आणि आराम :**

आपण झोपतो तेव्हा देखील मेंदूचे कार्य सुरूच असते. पुरेशा झोपेमुळे तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहता. प्रौढांना रोज रात्री ७ ते ८ तासांची झोप गरजेची आहे. झोपेमुळे तुम्हाला तजेलदारपणा मिळतो. तुमचा मूड चांगला राहतो आणि तुमची रोगप्रतिकार प्रणाली मजबूत बनते. झोपण्यापूर्वी तुम्ही रिलॅक्स व्हा. काही जण पुस्तक वाचतात, काही संगीत ऐकतात, तर काही जण गरम पाण्याने आंघोळ करतात.



# 'नागपुरी वडाभात'

**साहित्य:**

**::::वड्यांसाठी::::**

◆१/४ कप चणाडाळ ◆२ ते ३ टेस्पून मटकीची डाळ किंवा अख्खी मटकी ◆२ टेस्पून उडीद डाळ◆२ टेस्पून तूर डाळ ◆२ टेस्पून मसूर डाळ ◆२ टेस्पून मूग डाळ ◆७ ते ८ लसूण पाकळ्या ◆७ ते ८ हिरव्या मिरच्या ◆१/२ टीस्पून जिरे ◆१/४ कप चिरलेली कोथिंबीर ◆चवीपुरते मीठ ◆तळणीसाठी १ ते दीड कप तेल (लहान आकाराची कढई घ्यावी)

**::::भातासाठी::::**

◆१ कप तांदूळ ◆दीड कप पाणी ◆१/२ टीस्पून मीठ

**::::फोडणीसाठी::::**

◆४ टेस्पून तेल ◆१/४ टीस्पून मोहोरी ◆१/४ टीस्पून हिंग ◆२ चिमटी हळद ◆४ ते ५ सुक्या लाल मिरच्या

**कृती:**

◆फणस चिरून घ्यावा. विळीखाली वर्तमानपत्र पसरावे. तसेच वर्तमानपत्राचे मध्यम आकाराचे तुकडे तयार ठेवावेत. विळीच्या पात्याला आणि हाताला तेल लावून घ्यावे. ◆फणस मधोमध आडवा चिरावा. कागदाच्या तुकड्याने लगेच बाहेर आलेला चिक पुसावा. प्रत्येक अर्ध्या भागाचे ४ भाग करावे. साल काढण्यापूर्वी आतील गऱ्यांच्या वर चिवट पट्टी असते ती नीट काढून टाकावी. ही पट्टी शिजत नाही, त्यामुळे पूर्ण काढून टाकावी. सालाकडचा भाग विळीवर काढून टाकावा. सोललेला तुकडा पाण्यात बुडवून ठेवावा नाहीतर काळा पडतो. अशाप्रकारे सर्व फणस सोलून घ्यावा. ◆सोललेल्या फणसाचे छोटे छोटे तुकडे करावेत. लहान कुकरमध्ये हे तुकडे टाकावेत. तुकडे बुडेल इतपत पाणी घालावे. १/२ चमचा मिठ घालावे. ३ शिट्ट्या करून फणसाचे तुकडे मऊ शिजवून घ्यावे. ◆कढईत तेल गरम करून त्यात मोहोरी, जिरे, हिंग, हळद आणि सुक्या मिरच्या घालून फोडणी करावी. त्यात शिजवलेला फणस आणि शिजवलेले शेंगदाणे फोडणीस टाकावे. वाटल्यास थोडेसेच पाणी आणि तिखट घालावे. गूळ आणि मिठ घालून ५-७ मिनिटे शिजवावे.



# कशी वाढवावी शरीरामध्ये हिमोग्लोबिन

यामध्ये हिमोग्लोबिनचं प्रमाण कमीच असतं.जेव्हा ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त हिमोग्लोबिन घटल्यास शरीरातील रक्ताचं प्रमाण कमी होतं. मग उलट्या होणं, त्वचाविकार, उदासीनता यांसारख्या शारीरिक-मानसिक त्रासांना आयतंच आमंत्रण मिळतं.

अशा वेळी ब-६ जीवनसत्त्वयुक्त आहाराचा उपयोग होतो. त्याने हिमोग्लोबिनचं प्रमाण सुधारतं. पॅरिडॉक्सल, पॅरिडोक्झामाईन, पॅरिडोक्साईन हे ब-६ या जीवनसत्त्वाचे घटक आहेत. प्रत्येक व्यक्तीला साधारण दोन मिलीग्रॅम इतकी ब-६ या जीवनसत्त्वाची गरज असते. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी घटते. शरीराची वाढ खुंटते. त्वचाविकार यांसारख्या समस्या उद्भवतात. हाता-पायांतील शक्तीही कमी होते. हात-पायही भरपूर दुखतात. यकृतात स्निग्ध पदार्थ जमून त्याचं कार्य मंदावतं. त्यामुळे मेद आणि प्रथिनांचं शोषण नीट होत नाही.

यकृताचं कार्य मंदावल्यामुळे पोट बिघडतं. हिमोसिडरॉसिस नावाचा विकार होतो. या विकारात यकृत आणि पानथरीत (स्प्लीन) लोहाचे क्षार जमू लागून तिथल्या पेशी नष्ट होतात. अस्थिमज्जेस (हाडांमधला मगज, बेर्नमॉरो) इजा होते. प्रतिकारशक्ती घटते. मज्जासंस्थेच्या कामात अडथळे निर्माण होतात. लहान मुलांमध्ये ब-६ जीवनसत्त्वांचं घटल्यास त्यांना सारख्या फिट्स येतात.

कधी कधी क्षयाच्या रुग्णांनाही या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचा त्रास होतो. क्षयाच्या आजारात एलोपॅथीत आयसोनिकोटिनिक एसिड हायड्रॉझाईड नावाचं औषध देतात. या औषध उपचारामुळे ब-६ जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. यीस्ट या पदार्थात ब-६ फ हे जीवनसत्त्व भरपूर आढळतं. तसंच विविध प्रकारच्या बिया, अंकुरीत धान्यं आणि हिरव्या भाज्यांतही याचा भरपूर साठा असतो.

**ब-६ जीवनसत्त्वं देणारे अन्नपदार्थ**

- **फळं** – केळी, संत्री, सफरचंद, स्ट्रॉबेरी, पपनस, बेदाणा, जरदाळू आणि आक्रोड.
- **रसाहार, पेयं आणि सरबतं** – गाजर, कोबी, काकवी, दूध आणि दुधाचे पदार्थ, संत्री, टोमॅटो, पालक आणि शेळीचं दूध.
- **सूप आणि भाज्या** – फुलकोबी, टोमॅटो, कांदा, बीट, कोबी, अळंबी, पालक, लेटयूस, अल्फा अल्फा, मक्याचं दूध.
- **कोशिंबिरी** – फुलकोबी, बीट, कांदा, टोमॅटो.
- **चटण्या आणि लोणची** – यीस्ट, मिरी, गहू बीज तेल, बटाटा, कांदा, टोमॅटो.
- **तेल** – भाततूस तेल, सोयाबीन तेल आणि मक्याचं तेल. (ही तेलं फक्त गाळलेलीच हवीत म्हणजे फिल्टर्ड रिफाईंड, हायड्रोजनेटेड अजिबात नको.)
- **कच्चे, शिजवून, भाजून आणि उकडून खाण्यायोग्य पदार्थ** – फुलकोबी, शेंगदाणे, बटाटे, फरसबीचे दाणे, डाळी, सालपटांसह धान्यं, ओट्स (एकप्रकारचं गव्हासारखं धान्यं), वाटाणा, तांदूळ, गहू, घरगुती चीज, मका.

हवामानातील बदलाचा परिणाम हा त्वचेवरही होतो. वातावरणातील गारठ्यामुळे ओठांची त्वचा कोरडी पडते. कधी कधी ओठांना भेगा पडून त्यातून रक्त वाहू लागतं. तरुण, मध्यमवयाच्या रुग्णांपेक्षा वृद्धांमध्ये ओठांची त्वचा कोरडी पडून त्यातून रक्त वाहण्याच्या तक्रारी जास्त आढळतात.

वाढत्या वयामुळे त्वचेतील नैसर्गिक ओलावा कमी होत जातो. पाणी, फळं आणि कोशिंबिरीतून ओठांना जास्तीत जास्त नैसर्गिक पाण्याचा ओलावा मिळतो. त्यासाठी चोवीस तासांत किमान आठ-दहा ग्लास पाणी पिणं आवश्यक आहे. फळांमध्ये आणि कोशिंबिरींमध्ये पाण्याचा भाग ७५ टक्के असतो. त्यामुळे हे दोन्ही पदार्थ खाणं हे त्वचेबरोबरच आरोग्यासाठीही फायदेशीर ठरतं. ओठांचा मऊपणा टिकवण्यासाठी त्यांना नियमितपणे पेट्रोलियम जेली किंवा ई जीवनसत्त्व असलेल कोल्ड क्रीम लावणं गरजेचं आहे. हल्ली बाजारात निरनिराळे लीप ग्लासेसही उपलब्ध आहेत. मात्र ते डॉक्टरांच्या सल्ल्यानेच लावावेत.

ओठ काळे पडण्यांचं प्रमुख कारण आहे उन्हाळा. ओठांना जास्तीचं ऊनही सहन होत नाही. सतत उन्हात फिरण्याने सूर्य किरणातील अतिनील घटनांमुळे (अल्ट्राव्हायलेट) ओठ काळे पडतात. यासाठी दुपारच्या वेळेत उन्हात जाणं टाळावं. सनस्क्रीनचा वापर करावा. शरीरात जर हिमोग्लोबीन या घटकाची कमतरता निर्माण झाली असेल तरीही ओठ काळसर दिसतात. त्या साठी सर्व पालेभाज्या, फळं, मोड असलेली कडधान्यं यांचा आहारात समावेश असणं गरजेचं आहे. अनेक वेळा ओठांच्या कडांना चिरा पडतात. त्याचं कारण आहे, बफ जीवनसत्त्व आणि झिंक या खनिजाची कमतरता. त्यासाठी झिंक असलेली मल्टीव्हिटामिनची औषधं घेणं फायद्याचं ठरतं. पौष्टिक आहार, भरपूर पाणी, तसंच फळं आणि कोशिंबिरीतून ओठांना भरपूर ओलावा मिळतो.



# पाणी पिताना अशी घ्या काळजी...

दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्याठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते त्यांच्यासाठी तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...

१. **पाणी गाळून घेणे** – वॉटर प्युरीफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणी यांनी पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चागंल्या सोसायटीमध्ये राहतो त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.

२. **उकळणे** – पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्टया पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीव-जंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरुन जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

३. **तुरटी फिरवणे** – तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

४. **नळाला फडके किंवा फिल्टर बसविणे** – पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारी वेगवेगळी फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरु शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

# डीपी कोसळण्याच्या भीतीने ग्रामस्थांमध्ये चिंता



■डहाणू। प्रतिनिधी,

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत शेणसरी-गांगोडी अंतर्गत मौजे शेणसरी येथील वरठापाडा परिसरात विद्युत व्यवस्थेची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली असून मोडकळीस आलेली डीपी, जीर्ण वीज लाईन आणि अर्पुया विद्युत सुविधांमुळे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

परिसरातील वितरण रोहित्र (डीपी) पूर्णपणे जीर्णावस्थेत असून त्याच्या अगदी जवळ घरांची वस्ती आहे. परिसरात लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच गुरेढोरे मोठ्या प्रमाणात वावरत असल्याने डीपीमध्ये तांत्रिक बिघाड, शॉर्टसर्किट किंवा ती कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय वरठापाड्यातील जुनी विद्युत लाईनदेखील अत्यंत खराब अवस्थेत आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे आणि त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन कामांमध्ये अडथळे निर्माण होणे, या समस्या सातत्याने उद्भवत आहेत. सध्या परिसरात सुमारे ३८ वीजधारक कुटुंबे वास्तव्यास असून वाढत्या लोकसंख्येनुसार किमान २० नवीन विद्युत पोल उभारण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामपंचायतीने नमूद केले आहे.

या गंभीर प्रश्नाकडे संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्यात आले असतानाही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. नुकत्याच झालेल्या गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती बैठकीतही हा विषय पुन्हा चर्चेत आला. यावेळी नागरिकांनी संभाव्य दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी वेळेत कारवाई करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे महावितरण प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे किती गांभीर्याने लक्ष देते, याकडे संपूर्ण वरठापाडा परिसराचे लक्ष लागले आहे.

# मुंबईतील फेरिवाल्यांबाबत मोठा निर्णय, येत्या 10 जूनपर्यंत...

## मुंबई महापालिकेतील बैठकीत काय ठरलं?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईत हजारो फेरीवाले आहेत, यातील काही अधिकृत आहेत तर काही अनधिकृत आहेत. अशातच आता मुंबईतील फेरीवाले आणि त्यांच्या प्रश्नांबाबत महत्त्वाची बैठक पार पडली. महापालिका आयुक्तांसोबत झालेल्या या बैठकीला उपमहापौर संजय घाडी आणि शिवसेना नेते संजय निरूपम हेही उपस्थित होते. या बैठकीनंतर या दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद घेत फेरीवाल्यांबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. या बैठकीत नेमका काय निर्णय झाला याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**फेरीवाल्यांबाबत महत्त्वाची बैठक**

फेरीवाल्यांबाबत झालेल्या बैठकीनंतर बोलताना उपमहापौर संजय घाडी यांनी म्हटले की, शिवसेनेचे नेते संजय निरूपम यांनी चार दिवसांपूर्वी माज्याकडे एक निवेदन दिलं होतं. यात मुंबई शहरातील 99 हजार 435 अधिकृत वैध असलेल्या फेरीवाल्यांचे जे प्रश्न आहेत, याबाबत बैठक आयोजित करावी अशी मागणी करण्यात आली होती, त्याबाबत आज बैठक झाली. मुंबईमध्ये फेरीवाल्यांचा प्रश्न जुना आहे, अनेक वादविवाद यावर सुरु आहेत. अनेकदा कारवाई झाली आणि 2014 ला फेरीवाला कायद्याची तरतूद करण्यात आली.



आज मुंबईतील फेरीवाले आणि त्यांच्या प्रश्नांबाबत महत्त्वाची बैठक पार पडली. महापालिका आयुक्तांसोबत झालेल्या या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उपमहापौर संजय घाडी यांनी याबाबत माहिती दिली आहे.

**10 तारखेपर्यंत ओळखपत्र दिले जाणार**

पुढे बोलताना संजय घाडी यांनी म्हटले की, एकही अनधिकृत फेरीवाला मुंबईमध्ये राहिला नाही पाहिजे अशी आमची भूमिका आहे. 1 लाख 29 हजार 4 फेरीवाले पात्र आहेत. पण हायकोर्टाने आदेश दिल्यापासून अधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई सुरु आहे. अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई होतं नाही. जोपर्यंत क्यूआर कोड आणि ओळखपत्र देईपर्यंत कोणावर कारवाई होऊ नये. जून महिन्याच्या 10 तारखेपर्यंत ओळखपत्र देण्यात येणार आहे. टाउन वेंडिंग कमिटी नेमण्यात येणार आहेत त्यानुसार आयोजन करण्यात येणार आहे. टाउन वेंडिंग कमिटी जे काम करेल ते आम्हाला मान्य असेल. आता 10 दिवसानंतर सर्व फेरीवाले व्यवसाय करणार आहेत.

**सध्या कोणत्याही फेरीवाल्यावर कारवाई होणार नाही**

दरम्यान, आता 10 जूनपर्यंत मुंबईतील सर्व फेरीवाल्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे. त्यानंतर जे फेरीवाले अनधिकृतपणे व्यवसाय करत असेल त्याच्यावर कारवाई केली जाणार आहे. मात्र सध्या कोणत्याही फेरीवाल्यावर कारवाई होणार नाही अशी माहिती उपमहापौर घाडी यांनी दिली आहे.

# अर्नाळा येथील बंदरपाड्यात ट्रान्सफॉर्मरला पुन्हा आग... स्वतंत्र ट्रान्सफॉर्मरची मागणी

■वसई। प्रतिनिधी,

अर्नाळा येथील बंदरपाडा परिसरात अवघ्या आठवडाभरात दुसऱ्यांदा वीज ट्रान्सफॉर्मरला आग लागण्याची घटना घडली. मध्यरात्री झालेल्या या प्रकारामुळे परिसरातील वीजपुरवठा अनेक तास खंडित झाला. वाढत्या वीजभारामुळे ट्रान्सफॉर्मरवर ताण येत असल्याचा आरोप करत नागरिकांनी स्वतंत्र आणि अधिक क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी केली आहे.

वसई तालुक्यातील अनार्ळा बंदरपाडा परिसरातील वीज ट्रान्सफॉर्मरला शुक्रवारी मध्यरात्रीनंतर शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. रात्री 1 वाजण्याच्या सुमारास झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र ट्रान्सफॉर्मर जळल्याने परिसरातील वीजपुरवठा चार ते पाच तासांसाठी बंद पडला.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या सात दिवसांतील ही दुसरी घटना आहे. त्यामुळे परिसरातील वीज यंत्रणेच्या सुरक्षिततेबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. वाढती लोकसंख्या, नवीन बांधकामे आणि वाढलेला वीज वापर यामुळे सध्याच्या ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भर पडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. याच कारणामुळे वारंवार बिघाड होत असून आग लागण्याच्या घटना घडत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. आग लागल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच ग्रामस्थांनी रेती आणि मातीच्या सहाय्याने आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली.

दरम्यान, किल्ला रोड आणि आसपासच्या भागातील वाढती वीज मागणी लक्षात घेता स्वतंत्र आणि अधिक क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. सध्याची व्यवस्था अपुरी पडत असल्याने भविष्यात आणखी गंभीर दुर्घटना होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिक जनार्दन मेहेर यांनी सांगितले की, ''ट्रान्सफॉर्मरला वारंवार आग लागण्याच्या घटना चिंतेचा विषय बनल्या आहेत. संबंधित वीज वितरण विभागाने तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यास विलंब झाल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.''

# बॉक्सर कोचनं 17 वर्षीय मुलीला खोलीत बोलावलं, चुकीचा स्पर्श करत चार महिने..

■मुंबई। प्रतिनिधी,

एका बॉक्सर कोचने अल्पवयीन मुलीचे कथितरित्या लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. पीडितीचं वय 17 वर्षे होते. या प्रकरणी बॉक्सिंग कोचविरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. अल्पवयीन तरुणीच्या आईने या प्रकरणाची पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. शुक्रवारी दुपारी संपंगीरामनगर पोलीस ठाण्यात एफआरआय दाखल करण्यात आली. हे प्रकरण कर्नाटकातील बंगळुरूमध्ये घडलं आहे. आरोपी हा कस्तूरबा रोड परिसरातील खासगी बॉक्सिंग क्लबमध्ये कोच म्हणून काम करत होता. आरोपीवर गेल्या चार महिन्यांपासून अल्पवयीन मुलीचा छळ केल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला. तक्रारीनुसार कर्नाटकबाहेर नुक्त्यात झालेल्या एका क्रीडा स्पर्धेदरम्यान छळ झाला. 17 मे रोजी. पीडित मुलगी बॉक्सिंग स्पधेर्साठी चेन्नईत असताना, प्रशिक्षकाने तिला कथितरित्या आपल्या खासगी खोलीत बोलावले, तिने येण्यास विरोध केला, मात्र तिच्यावर जबरदस्ती करण्यात आली. तिला चुकीचा स्पर्श केला. तक्रारीत पुढे म्हटलं की, बंगळुरूतील एका स्टेडियममध्येही तिच्या चुकीचा स्पर्श केल्याच्या घटना आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेनं भीतीपोटी हा अत्याचार आपल्या कुटुंबापासून लपवला होता, प्रशिक्षकाने तिला जीवे मारण्याची धमकी देखील दिली, नंतर हे प्रकरण उघडकीस आणल्यास जीवे सोडले जाणार नाही अशी धमकी देखील दिली. पीडितेच्या आईने सांगितलं की, गेल्या 10 वर्षांपासून तिची मुलगी प्रशिक्षण घेत होती. घडलेल्या घटनेनुसार, गेल्या पाच ते सहा महिन्यांत या गैरवर्तनाची तीव्रता वाढली होती. पोलिसांच्या हस्तक्षेपापूर्वी, प्रशिक्षकाच्या गैरवर्तनाबाबत क्लब अंतर्गत समितीकडे औपचारिक तक्रार देखील दाखल केली होती. अशातच तातडीने हस्तक्षेप करण्याची अनेकदा विनंती देखील केली. पोलिसांनी कोचविरूद्ध पॉक्सो कायदा, 2012 च्या कलम 8 आणि 12 आणि भारतीय दंड संहिता, 2023 कलम 351 (2) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

# बाप मुलीच्या सासरी गेला अन् हादरलाच, 6 महिन्यांपूर्वीच सगळं संपलं होतं




**पत्नीला कर्करोग आणि आर्थिक चणचण**

पीडित वडिलांनी सांगितले की, काही काळानंतर त्यांच्या पत्नीला कर्करोग (कॅन्सर) सारख्या गंभीर आजाराने ग्रासले, ज्यामुळे संपूर्ण कुटुंब मानसिक आणि आर्थिक संकटात सापडले होते. यादरम्यान कुमकुमने आपल्या आजारी आईला भेटण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली होती, परंतु सासरच्या लोकांनी विविध कारणे सांगून तिला माहेरी येऊ दिले नाही. मृत विवाहितेच्या वडिलांनी आरोप केला आहे की, नोकरीचे कारण पुढे करून जावई आणि त्याच्या कुटुंबीयांनी त्यांच्याकडून 1.80 लाख रुपये रोख आणि सुमारे 2.20 लाख रुपयांचे दागिने घेतले होते. एवढे देऊनही सासरच्या लोकांचे समाधान झाले नाही आणि ते सतत बुलेटची आणि 5 लाख रुपयांची मागणी करू लागले. ही मागणी पूर्ण न झाल्यामुळे त्यांनी कुमकुमचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला.

■येवला। प्रतिनिधी,

हुंडा देणे आणि घेणे याला कायद्याने बंदी आहे. मात्र हुंड्यामुळे छळ, आत्महत्या, हत्या असे अनेक प्रकार समोर येत असतात. असाच एक प्रकार समोर आला आहे. एका प्रेमविवाह केलेल्या विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित तरुणीच्या वडिलांनी जावई, सासू-सासऱ्यांसह एकूण सहा जणांविरोधात हुंड्यासाठी छळ करून हत्या केल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मुलीच्या मृत्यूची माहिती तिच्या माहेरच्यांना तब्बल सहा महिन्यांनी मिळाली. बिहारच्या माधेपुरा परिसरातील ही घटना आहे.

**'असा' झाला विवाह**

या घटनेची पार्श्वभूमी अशी आहे की, कुमकुम कुमारी हिचा दिलरंजन कुमारसोबत प्रेमविवाह झाला होता. दोघांचे इंस्टाग्रामच्या माध्यमातून सूत जुळले होते. त्यांच्या प्रेमाला कुटुंबाचा विरोध होता. मात्र दोघांनी घरातून पळून जाऊन 24 एप्रिल 2024 रोजी एका मंदिरात विवाह केला आणि त्यानंतर कोर्ट मॅरेज केले. नंतर कुमकुमने व्हॉट्सअॅपवर तिच्या विवाहाचे प्रतिज्ञापत्र वडिलांना पाठवले. मुलगी सज्ञान असल्याने तिच्या आनंदासाठी कुटुंबाने हा विवाह स्वीकारला. काही दिवसांनी मुलगी आणि जावयाला घरी बोलावण्यात आले, तसेच जावयाच्या आई-वडील आणि भावालाही आमंत्रित करण्यात आले. सामाजिक परंपरेनुसार मुलीला सन्मानपूर्वक सासरी पाठवण्यात आले. त्यानंतर मुलगी आणि जावयाचे येणे-जाणे सुरू होते.

**सहा महिन्यांपूर्वी शेवटचा संवाद**

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 19 डिसेंबर 2025 रोजी मुलीशी त्यांची शेवटचं बोलणं झालं होतं. त्यानंतर सासरच्यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक ब्लॉकलिस्टमध्ये टाकला. दरम्यान, 22 एप्रिल 2026 रोजी कर्करोगाने ग्रस्त असलेल्या त्यांच्या पत्नीचे निधन झाले. याची माहिती त्यांनी मेसेजद्वारे मुलगी आणि जावयाला दिली, परंतु सासरच्या बाजूने कोणीही अंत्यसंस्काराला आले नाही. संशय आल्याने 24 मे रोजी जेव्हा वडील मुलीच्या सासरी पोहोचले, तेव्हा जावई घरात नव्हता.

आजूबाजूच्या लोकांकडे चौकशी केली असता, त्यांच्या मुलीचा मृत्यू सहा महिन्यांपूर्वीच झाल्याचे उघड झाले. या धक्कादायक खुलाशानंतर त्यांनी सर्व माहिती गोळा केली आणि आलमनगर पोलीस ठाणे गाठून हुंडाबळीची तक्रार नोंदवली. पोलिसांनी पीडित वडिलांच्या तक्रारीवरून जावई दिलरंजन कुमार, सासरा किशोर राम, सासू ललिता देवी, दीर गुरुदेव कुमार, नील राम आणि जावयाचा मित्र आशुतोष आनंद यांच्याविरुद्ध हुंडाबळीचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# बाप अन् सावत्र आईने अल्पवयीन मुलीसोबत केलं कांड

■मुंबई। प्रतिनिधी,

एका जन्मदात्या बापाने आपल्या दुसऱ्या पत्नीसोबत मिळून बारावीत शिकणाऱ्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलीची अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर, या गुन्ह्याचा पुरावा मिटवण्यासाठी त्यांनी कोणालाही न सांगता अत्यंत गुप्तपणे मृतदेहावर अंत्यसंस्कारही उरकून घेतले. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे. हे धक्कादायक प्रकरण उत्तर प्रदेशातील भावनपूर परिसरातील गोकुळधाम सोसायटीत घडले असून, आरोपी बापाचे नाव कपिल असे आहे.

**हत्या करुन गुपचूप उरकले अंत्यसंस्कार**

मिळालेल्या माहितीनुसार, कपिलचा विवाह 2009 मध्ये प्रीती नावाच्या महिलेशी झाला होता. या संसारातून त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाली. मात्र, 2017 मध्ये प्रीतीचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. तिच्या मृत्यूनंतर अवघ्या 6 महिन्यांतच कपिलने पिंकी नावाच्या महिलेशी दुसरे लग्न केले. या दुसऱ्या लग्नानंतर घरातील वातावरण सातत्याने बिघडत गेले. सावत्र आई आणि वडिलांकडून मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू झाला. अखेर सोमवारी (25 मे) रात्री कपिल आणि पिंकी या दोघांनी मिळून या 17 वर्षीय मुलीची गळा दाबून हत्या केली आणि दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी कोणालाही थांगपत्ता लागू न देता मृतदेह गढमुक्तेश्वर येथे नेऊन त्यावर अंत्यसंस्कार करून टाकले.




**'हे लोक मला मारुन टाकतील'**

या घटनेची माहिती मृत मुलीचे मामा भूपेंद्र शर्मा यांना मंगळवारी दुपारी फोनवरून मिळाली. मात्र, नातेवाईक मेरठला पोहोचेपर्यंत आरोपींनी अंत्यसंस्कार उरकले होते. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी तात्काळ पोलिसात धाव घेतली आणि पोलिसांकडे एक ऑडिओ क्लिप सुपूर्द केली. या ऑडिओ रेकॉर्डिंगमध्ये मृत मुलगी रडत रडत आपल्या मावशीला सांगत होती की, 'मला येथून घेऊन जा, नाहीतर हे लोक मला मारून टाकतील.' यावरून ती मुलगी गेल्या अनेक वर्षांपासून नरकयातना भोगत असल्याचे स्पष्ट झाले असून, तिच्या हत्येचा कट आधीच रचला गेला होता, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

**आरोपी ताब्यात**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून तपास सुरू केला. भावनपूर पोलिसांनी पीडित मुलीचे मामा भूपेंद्र शर्मा यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या चौकशीदरम्यान आरोपी बाप कपिल आणि सावत्र आई पिंकी यांनी आपला गुन्हा कबूल केला असून, पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या अत्यंत गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने समाजात अनेक गंभीर प्रश्न निर्माण केले असून, एक बाप स्वतःच्या मुलीशी एवढा क्रूर कसा वागू शकतो आणि मुलगी एवढ्या वर्षांपासून छळ सहन करत असताना आजूबाजूचे लोक गप्प का होते, असा संतप्त सवाल विचारला जात आहे.


# आईस्क्रीम खाताना मुलाला धक्काच बसला

## आत सापडला 3 इंचांचा किडा... कल्याणमध्ये खळबळ

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यातील कल्याण पूर्वेतमधील कोळसेवाडी परिसरातून एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका लहान मुलानं खरेदी केलेल्या एका कोन आईस्क्रीममध्ये तब्बल तीन इंच लांबीचा किडा आढळल्यानं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. कल्याण पूर्व येथील, रचना पार्क येथील एका दुकानातून शशांक जाधव नावाच्या मुलाने कोन आईस्क्रीम खरेदी केलं होतं. आईस्क्रीम खाण्यास सुरुवात करताच त्यामध्ये किडा असल्याचं त्याच्या निदर्शनास आलं. हा प्रकार समोर येताच मुलाच्या कुटुंबियांनी संबंधित दुकान गाठून तीव्र संताप व्यक्त केला आणि याबाबत स्पष्टीकरण मागितलं. घटनास्थळी काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन दुकानदारानं संबंधित कंपनीच्या वितरकाला (डिस्ट्रीब्युटर) देखील घटनास्थळी बोलावलं. दुकानदाराने आपली बाजू मांडताना सांगितलं की, 'या प्रकरणात त्याची कोणतीही चूक नाही. संबंधित आईस्क्रीमची एक्सपायरी डेट 2027 पर्यंत वैध असून ते कंपनीकडून सीलबंद अवस्थेत प्राप्त झालं होतं'. घरच्यांनी ते आईस्क्रीम जवळून पाहिले असता त्यात तब्बल लांब आणि जाड किळसवाणा असा किडा चिकटलेला होता. धक्कादायक गोष्ट म्हणजे या आईस्क्रीमच्या पॅकेटवरील एक्सपायरी डेट ही 2027 पर्यंतची होती.



# तरूणीच्या शरीराला रक्त फासलं, ठिकठिकाणी सामूहिक अत्याचार, एवढ्यावर न थांबता...

■मुंबई। प्रतिनिधी,

दक्षिण पूर्ण दिल्लीत माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका 23 वर्षीय पीडितेला ओलीस ठेवून तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आला होता. नंतर तिला धर्म परिवर्तनास भाग पाडण्यास जबरदस्ती केली. या संपूर्ण कटाचा सूत्रधार फहीम नावाचा एक अवैध शस्त्र पुरवठादार आहे. पीडितेला घाबरवण्यासाठी आणि तिचे मनधौयार्चे खच्चीकरण करण्यासाठी आरोपीने तिच्यावर जनावरांचे रक्त आणि मांसाचे तुकडे फेकले. या प्रकरणात पोलिसांच्या तपासातून गंभीर प्रश्न उपस्थित झाले. या प्रकरणी पोलिसांनी एफआरआय दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपीची ओळख फहीम असल्याची समोर आली.

**सोशल मीडियावर ओळख लपवून तरूणीला फसवून नको तेच...**

संबंधित प्रकरणातील ही संपूर्ण घटना 2021 मध्ये सोशल मीडियावर उघडकीस आली होती. आरोपी फहीमने आपली ओळख लपवून आपण साहिल असल्याची माहिती समोर आली. त्याने आपण श्रीमंत असल्याचे सांगितले, नंतर पीडित तरुणीला बळीचा बकरा बनवलं. आरोपीने तिच्याशी विवाह करण्यासाठीचं वचन देखील दिलं. 2022 मध्ये आरोपीने तिला दिल्लीच्या बाटला हाऊस परिसरात भेटण्यासाठी देखील बोलावलं होतं. तिथे पोहोचल्यावर महिलेच्या लक्षात आलं की, साहिल खरं तर फहीम आहे. यानंतर प्रकरण उघडकीस आल्यानंतर फहीम आणि त्याच्या साथीदारांनी पीडितेला ओलीस ठेवण्याचा प्रयत्न केला, नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता.

**पीडितेच्या शरीराला जनावरांचं रक्त फासलं**

पीडितेची अंगावर काटा आणणारी तक्रार असून पीडितेच्या म्हणण्यांनुसार, फहीम आणि त्याच्या नातेवाईक अवैध शस्त्र तस्करी करतात. आरोपींनी मानसिक आणि शारीरिक छळ देखील केला आहे. तिला घाबरवण्यासाठी तिच्या संपूर्ण शरीराला जनावरांचे रक्त फासले, यामुळे ती पूर्णपणे ती भयभीत झाली होती. तिच्या अंगावर मांसाचे तुकडे देखील टाकले होते. यानंतर तस्लीम नावाच्या एका मैलवीने मुलीचा छळ करून तिला धर्मांतरण करण्यास भाग पाडले.

**ठिकठिकाणी पीडितेवर सामूहिक अत्याचार**

प्रकरणातील आरोपीची क्रूरता अनेकदा थांबली नाही, बाटला हाऊसमध्ये तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आला. त्यांनी पीडितेचा आक्षेपार्ह व्हिडिओ देखील बनवला होता, व्हिडिओचा वापर करत तिला सतत ब्लॅकमेल केलं. आरोपींनी तिला घटनास्थळावरून मेरठला नेलं आणि तिथेही सामूहिक लैंगिक अत्याचार केला होता. अशा स्थितीत पीडितेनं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केल्यास आरोपींनी तिच्या निष्पाप लहान मुलींना जीवे मारण्याची धमकी देखील दिली होती. आपल्या मुलीच्या सुरक्षेसाठी पीडितेनं 2022 ते 2024 असी दोन्ही वर्षे तिला नको अशी परिस्थिती भोगावी लागली.

दरम्यान, 2025 मध्ये गुरुग्राम पोलिसांनी मुख्य आरोपी फहीमला एका भलत्याच प्रकरणात अटक केली. पोलिसांनी फहीमचा मोबाईल जप्त केला, ज्यात पीडितेचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि फोटो होते. या प्रकरणी पीडितेला खात्री देण्यात आल्यानंतर व्हिडिओ आणि फोटो हटवण्यात आले. जेव्हा याबाबत पीडितेला माहिती दिली की, संबंधित व्हिडिओ हटवण्यात आलेत, ते लीक करता येणार नाहीत, तेव्हा तिने पोलिसांकडे जाण्याचे धाडस दाखवले होते.

दक्षिण पूर्ण दिल्लीचे डीसीपी हेमंत तिवारी यांच्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणात 14 मे 2026 रोजी जामिया नगर पोलीस ठाण्यात एफआरआय दाखल केली. पीडितेनं तिच्या तक्रारीत फहीम, खुर्शीद, झैद, अझीम, तालीम आणि नफीस या पाच आरोपींनी नावे दिली आहेत. पोलिसांनी कारवाई करत चौघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. तर एक आरोपी मेरठ येथे दुसऱ्याच प्रकरणात अटक आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com